सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION


**मुख्य कार्यालय**

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 ( 2267 0210 /148 /248,22102222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001( 2267 0210/148/248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

**विक्रीकर भवन, 9 वा मजला,रुम नंबर 915, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई 400203 (23742191 फॅक्स :** 23781061

**Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 (23742191 Fax : 23781061**

ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


## महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य ) सेवा (पूर्व) परीक्षा -२०१२

**धारिका क्रमांक : ३७४(१) एक (१) / २०१२ / तीन** **जाहिरात क्रमांक : २४६/२०१२ (अनुशेषाची पदे)**

आयोगातर्फे महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा (पूर्व) परीक्षा २०१२ **रविवार दिनांक ५ ऑगस्ट, २०१२** रोजी औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे या चार जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल. प्रस्तुत पदावरील भरतीसाठी उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

२.१ **पदाचे नाव व विभाग** :- सहायक अभियंता (स्थापत्य) गट-ब, श्रेणी २, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभाग

२.२ **एकूण पदसंख्या** :-२४५ (अनुशेष)

२.३ पदसंख्येचा तपशीलः-

| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज. (क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण पदे** | ९६ | ९४ | १७ | १४ | ९ | ८ | ७ | -- | -- | २४५ |
| **महिला** | २९ | २८ | ५ | ४ | ३ | २ | २ | -- | -- | ७३ |
| **अपंग** | चलनवलन विषयक विकलांगता -१०, श्रवणशक्तीतील दोष -१५ | | | | | | | | | २५ |
| **खेळाडू** | ५ | ५ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १२ |

२.४ उपरोक्त पदे अनुशेषाची असून पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.५ वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) वर्गवारीपैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

२.६ महिलांसाठी व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.७ महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.८ शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक अपंग -२०११/९१/सुधार -३, दिनांक १७ मार्च, २०११ नुसार अंधत्व किंवा क्षीण दृष्टी, श्रवण शक्तीतील दोष तसेच चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू या प्रकारातील उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत. परंतु सदर जाहिरातीमधून भरण्यात येणारी पदे अनुशेषाची असल्याने फक्त चलनवलन विषयक विकलांगता व श्रवणशक्तीतील दोष या प्रकारातील अपंग उमेदवार अर्ज करु शकतात.

२.९ अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील. तसेच, जास्तीत जास्त अपंगत्व असणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

२.१० अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

२.११ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि त्यांनी तसे आयोगास परीक्षेपूर्वी स्वतंत्ररित्या विनंती करणे आवश्यक आहे.

२.१२ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३. वेतनश्रेणी**- रुपये ९,३०० - ३८,४०० + ग्रेड पे रुपये ४,४००/-, एकूण वित्तलब्धी अंदाजित रुपये २६,७१५/-

**४. पात्रतेविषयक अटी** :-

४.१ भारतीय नागरिक.

४.२ वयोमर्यादा - १ ऑक्टोबर, २०१२ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

४.३.१ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

४.३.२. माजी सैनिक, आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ठ अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिलक्षम

४.३.३ अपंग उमेदवारांसाठी ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम

४.३.४ शैक्षणिक अर्हता:- मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

४.३.६ शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांकः डीसीएस -१०८९/२१४८/का. सेवा -३,दिनांक २५ एप्रिल, १९९० व शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक जीटीआय/१०९८/१४५७९/(२३०/९८) ता.शि. २, दि.१५ मार्च, १९९९, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक न्यायप्र-१००५/(३०/०५) तांशि-२, दि.१८ जुलै, २००५ तसेच, इतर प्रचलित शासन निर्णयान्वये समकक्ष अर्हता धारण करीत असलेले उमेदवारही अर्ज करण्यास पात्र ठरतील.

४.३.७ पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु ते मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत त्यांनी पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

४.३.८ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" तसेच " **परीक्षा** " या विभागातील "**महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा गट-ब**" अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. प्रस्तुत भरतीकरिता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० " लागू आहे.

७. **शुल्क** : रुपये १३५/-

८. **अर्ज करण्याची पद्धत** :-

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २० जून, २०१२ ते १० जुलै, २०१२** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

८.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

८.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) क्रेडिट कार्ड (३) डेबिट कार्ड
(४) नेटबँकिंग (५) कॅश कार्ड

८.६ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे रक्कम भरल्यास संबंधित बॅकेकडून आयोगास रक्कम हस्तांतरित झाल्यानंतर उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत (Payment Received) त्वरित सूचना प्राप्त होईल. तसेच उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस आयोगाकडून पाठविण्यात येईल. याबाबत अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी उमेदवाराने स्वतः खातरजमा करावी.

८.७ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यास दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

८.८ चलनाद्वारे रक्कम भरल्यावर दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक पाठवावा.

८.९ चलनाद्वारे अथवा ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क आयोगाने निश्चित केलेल्या कालावधीतच भरण्याची खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

८.१० प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

८.११ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

९. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे रक्कम भरण्याची कार्यवाही **दिनांक १०, जुलै २०१२** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१०. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ११ जुलै, २०१२ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

११. महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा गट-ब(पूर्व)तसेच(मुख्य) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**दी. प्र. मिरजकर**
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुंबई
दिनांक : २० जून, २०१२.